महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ४ मार्च, २०२२.

क्रमांक:३९९१/क-१, या सचिवालयातील श्री.सचिन सु. बाभळगांवकर, कक्ष अधिकारी यांची श्री.अ.श.पाटील, अवर सचिव (समिती) यांच्या प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या **"अवर सचिव (समिती)"** (गट-अ) (एस-२३:६७७००-२०८७००) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

२. श्री.स.सु.बाभळगांवकर, कक्ष अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा आहे. तथापि, कार्यालयीन कामकाजाची निकड लक्षात घेता श्री.बाभळगांवकर यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून २ दिवसाच्या आत कार्यालयात हजर होणे आवश्यक राहील.

३. श्री.बाभळगांवकर यांना अवर सचिव (समिती) पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी अवर सचिव (समिती) संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास श्री. बाभळगांवकर यांना अवर सचिव (समिती) पदावरुन कक्ष अधिकारी पदावर पदावनत करण्याच्या अधीन सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(ब) सदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात आली आहे.

(क) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे श्री. बाभळगांवकर यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**प्रतिलिपी :-**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

८) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२१), मंत्रालय, मुंबई.

९) श्री.सचिन सु.बाभळगांवकर, कक्ष अधिकारी (सद्य:स्थितीत मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात कक्ष अधिकारी पदावर कार्यरत).

१०) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

११) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. यांनी सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत आस्थापना कक्षास आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसात कळवावे.

१३) वैयक्तिक नस्ती.

१४) निवडनस्ती.

\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2022\promotion\Class 1\Under Sec(comm)\order.doc